राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through State Government) खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनीलोन सहकारी साखर कारखान्यांना उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र.ससाका-२०१९/प्र.क्र.८०/३-स
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दि. १८ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :- १. साखर आयुक्त यांचा प्रस्ताव दि. २५.४.२०१९, दि. १४.६.२०१९, दि. २६.६.२०१९, दि.२७.६.२०१९, दि. २८.६.२०१९ व दि. १६.७.२०१९
२. मा. मंत्रीमंडळाच्या दि. २८.०८.२०१९ आणि दि. ९.९.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचा शासन निर्णय क्र.ससाका-२०१९/प्र.क्र.८०/३-स, दि. ५.९.२०१९ आणि दि. ११.९.२०१९.

प्रस्तावना:-

राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through State Government) खेळत्या भाग भांडवलासाठी मार्जिन मनी लोन उपलब्ध करून देण्याबाबतच्या प्रस्तावावर मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक २८.०८.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार सदंर्भ क्र. ३ अन्वये तांत्रिक-आर्थिक समिती तसेच मा.मंत्री समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच मा.मंत्रीमंडळाच्या दि. २८.८.२०१९ आणि दि. ९.९.२०१९ च्या बैठकीतील निर्णयानुसार शासन निर्णय दि. ११.९.२०१९ निर्गमित करण्यात आला आहे.

खेळत्या भागभांडवलामध्ये सन २०१९-२० मधील FRP ऊस दर अदा करण्याचा समावेश होतो किंवा कसे याबाबत राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्या अभिप्रायानंतर सन २०१९-२० मधील FRP ऊस दर अदा करण्याच्या रकमेचा समावेश खेळत्या भागभांडवलामध्ये करुन त्यानुसार संदर्भीय शासन निर्णय दिनांक ११.०९.२०१९ अन्वये पात्र ठरणाऱ्या कारखान्यास यापुर्वी कारखान्याने मागणी केलेल्या मर्यादेत रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबतची बाब शाासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

१. राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांनी पुढील म्हणजेच गाळप हंगाम २०१९-२० मधील FRP दर अदा करण्याच्या रक्कमेचा समावेश खेळत्या भागभांडवलाच्या परिभाषेत होतो असे स्वयंस्पष्ट अभिप्राय दिल्यास मा. मंत्रिमंडळाच्या दि. २८.०८.२०१९ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार, शासन निर्णय दि. ११.०९.२०१९ अन्वये पात्र ठरणाऱ्या कारखान्यास यापुर्वी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मागणीच्या मर्यादेत राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडे राज्य शासनामार्फत शिफारस करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता पुढील अटींच्या तसेच मुद्यांची खातरजमा करण्याच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१. सन २०१९-२० चा गाळप हंगाम सुरू झाल्यानंतर साखर आयुक्त यांनी शासन निर्णय दि. ११.०९.२०१९ अन्वये पात्र साखर कारखान्याने गाळप केलेला ऊस, साखर विक्री व इतर उपपदार्थ विक्री (सहवीज, इथेनॉल, डिस्टीलरी) या मार्गाने येणारे उत्पन्न लक्षात घेवून तसेच सन २०१९-२० मध्ये FRP अदा करण्यासाठी केंद्र शासनाने सॉफ्ट लोन योजना जाहीर केल्यास या पर्यायाची देखील उपलब्धता लक्षात घेवून गाळप हंगाम २०१९-२० मधील FRP दर वेळेवर अदा करण्यासाठीच्या रक्कमेची कारखान्यास आवश्यकता असल्याचे साखर आयुक्त यांनी शिफारस करणे आवश्यक आहे.

२. शासन निर्णय दिनांक ११.०९.२०१९ (संदर्भीय क्र. ३) मधील सर्व अटी लागू राहतील.

३. सदर कर्जाची वसुली कारखान्याच्या इथेनॉल मधून येणाऱ्या उत्पन्नातून देखिल करावयाची असल्याने यानुषंगाने इथेनॉल खरेदी करणाऱ्या कंपनी बरोबर (Petroleum Marketing Company), कारखाना व साखर आयुक्त यांनी त्रिपक्षीय (Tripartite) करार करावा. सदर रक्कम Escrow account मध्ये जमा करावी. सदर रक्कम NCDC च्या परतफेड वेळापत्रकातील देय हप्त्यापुर्वी जमा होईल याबाबत साखर आयुक्तांनी Petroleum Marketing Company बरोबर समन्वय ठेवावा. या खात्यामध्ये जमा झालेल्या रकमेतून प्रथमत: शासनाची सदर देय रकमेचा हप्ता वसूल करण्यात येईल, तद्नंतर उर्वरित रकमेचा कारखान्यास विनियोग करता येईल.

२. शासन निर्णय दि. ११.९.२०१९ नुसार पात्र होणाऱ्या कारखान्याची राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडे शिफारस करणे हा राज्य शासनाचा स्वेच्छाधिकार असुन निधीच्या उपलब्धतेनुसार/ शासनाच्या त्यावेळच्या आर्थिक स्थितीनुसार शासन पात्र कारखान्यांसाठी राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडे शिफारस करण्याबाबत निर्णय घेईल.

३. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि. २८.०८.२०१९ व दिनांक ०९.०९.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक. ४०५/२०१९/ व्यय-२, दि. १८.९.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०९१८१७५६३३७२०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरी करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73,
serialNumber=8ff188a569f4a95d2f0ce8ca61e60d8aa5f51a1bf65b42dd49bb26d165941d9e, cn=Sudin Gaikwad
Date: 2019.09.19 16:40:37 +05'30'

(डॉ.सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव,

२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. सर्व मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधान सभा सदस्य, विधान मंडळ, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (मुळ स्वाक्षरीच्या १० प्रतींसह)
११. प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे
१२. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१३. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर.
१४. निवड नस्ती (३-स)